# नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, अहमदनगर
# (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक) अहमदनगर

---

## -: बँकेच्या स्वमालकीच्या वाहनांचा जाहीर विक्री निविद अटी व शर्ती :-

१) बँकेच्या खाली नमूद केलेल्या डिझेलवरील वाहनांचा जाहीर विक्री निविदाव्दारे **जसे आहे आणि जिथे आहे ज्या स्थितीत व जे आहे** त्या स्थितीत करावयाचा आहे. सदर वाहनांचा सरकारी कर एक रकमी (वनटाईम टॅक्स) भरण्यात आलेला आहे व विमा देखील भरण्यात आलेला आहे.

| अ.नं. | वाहन | वाहनाची कंपनी | रजिस्टेशन तारीख | विक्रीसाठी राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | एम.एच.१६ बीएच ३२९१ | मारुती कंपनी एरटिगा | ०१/०८/२०१५ | २,१५,६००/- |
| २. | एम.एच.१६ बी.एच.३२८२ | मारुती कंपनी एरटिगा | ०१/०८/२०१५ | २,५३,०००/- |
| ३. | एम.एच.१६ एटी ३३८४ | टाटा कंपनीची सुमो | २६/०९/२०१२ | १,८७,०००/- |

२) वर नमुद केलेल्या वाहनांची राखीव किमंतीच्या १०% बयाणा अनुक्रमे रक्कम रुपये २१,५६०/-, २५,३००/- व १८,७००/- .

३) मोहोरबंद निविदा सोबत १०% बयाणा रकमेचा भरणा डिमांड ड्राफव्दारे "नगर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि., अहमदनगर " या नावाने अहिल्यानगर येथे देय असलेला निविदा फॉर्म सोबत जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदा धारकांना बयाणा रक्कम परत करणेत येईल बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.

४) मोहोरबंद निविदा पद्धतीने विक्री करावयाची आहे. सदरील वाहनांची **जशी आहे आणि ज्या स्थितीत व जे आहे** या अटीवर तसेच सदर वाहनाबाबत कोणतीही हमी , खात्री जबाबदारी इत्यादीबाबत मा.अवसायक व बँकेचे अधिकारी जबाबदार असणार नाहीत यशस्वी निविदा धारकांच्या नावानेच **विक्री सर्टीफिकेट** दिले जाईल.

५) सदरील वाहनाची राखीव किंमतीपेक्षा कमी किमतीत विक्री केली जाणार नाही.

६) निविदा दाखल करण्याची अंतिम तारिख २३/१०/२०२६ दुपारी ५.०० वाजेपर्यंत निविदा बँकेचे अवसायक /सहाय्यक प्रमुख व्यवस्थापक यांचेकडे बँकेच्या प्रधान कार्यालय, अहिल्यानगर या ठिकाणी दाखल कराव्यात मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

७) यशस्वी निविदा धारकास खरेदी रकमेच्या २५% रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रकमेसह) मोहोरबंद निविदा प्रक्रिया समाप्त झाल्यावर त्याच दिवशी किंवा ३ दिवसांच्या आत जमा करावी लागेल. उर्वरीत (७५%) रक्कम ही ३० दिवसांच्या आत जमा करण्यात कसूर झाल्यास आधी जमा केलेली रक्कम जप्त करुन मालमत्तेची पुर्न:विक्री केली जाईल.

८) टेंडर उघडण्याचे दिवशी अवसायक सर्वोच्च निविदा भरणाऱ्या निविदा धारकास यशस्वी घोषित करतील अथवा बँक (अवसायक) यांनी निविदा दाखल करणाऱ्या व्यक्तींना अंतर्गत बोली लावणेसाठी निमंत्रित करु शकते. निविदा राखीव किंमती पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. यशस्वी निविदा धारकांस वाहन स्वत:च्या नावावर करुन घेण्यासाठी लागणारा सर्व खर्च व तदनुषांगिक इतर खर्च भागविण्यासाठी जबाबदारी खरेदीदाराची राहील.

९) बँकेकडून विक्रीचे प्रमाणपत्र दिले जाताच विक्रीची पुर्तता होईल व कोणताही दावा बँक स्विकारणार नाही.

१०) वाहन विक्री करणेसाठी बँकेचेवतीने कोणतेही वचन किंवा निवेदन या सुचनेत समाविष्ठ नाही व उल्लेखित नाही. कोणतेही कारण अथवा कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे, विक्री स्थगित करणे, पुढे ढकलणे अथवा विक्रीच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार बँक अवसायक, अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. त्यास निविदादार आवाहन देऊ शकणार नाही.

११) वाहन नावावर / ट्रान्सफर करुन घेणेसाठी कायदेशीर दृष्टीकोनातून सर्व प्रकारचा खर्च स्वत: खरेदीदाराला करावा लागेल.

Nagar Urban Co-op. Bank Ltd
Ahmednagar
Regd No
MSCS/CR/
804/2013
Dt.4/4/2013
Multi-State Scheduled Bank

Scanned with OKEN Scanner

१२) पुढील तपशील / चौकशी / विक्रीच्या अटी व शर्तीसंबंधी तपशील नगर अर्बन को-ऑप.बँक लि., अहमदनगर यांचे प्रधान कार्यालय येथे अवसायक/सहाय्यक प्रमुख व्यवस्थापक यांचेकडे मिळेल. कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँक अवसायक यांनी राखून ठेवला आहे. विक्री सुरक्षित धनकोच्या मान्यतेच्या अधिन राहील.

१३) सदर वाहन विक्रीचा निविदा फॉर्म बँकेच्या प्रधान कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या दिवशी व वेळेत दिनांक १३/१०/२०२६ पासून ते दिनांक २३/१०/२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) संध्याकाळी ३.०० वाजेपर्यंत मिळेल. निविदा फॉर्मची किंमत रक्कम रुपये ५००/- अधिक जी.एस.टी.सह विनापरतावा राहील.

१४) निविदा उघडण्याची तारीख २६/१०/२०२६ वेळ दुपारी १.०० वाजता ठिकाण बँकेचे प्रधान कार्यालय, पानसरे गल्ली, बँक रोड, अहिल्यानगर .

१५) वाहनाबाबत रितसर सर्व नोंदी मे. आर.टी.ओ.ऑफिस अगर अन्य आवश्यक त्या संबंधीत अधिकाऱ्याकडे त्यांचे स्वखर्चाने करुन घ्याव्यात व इतर कोणत्याही प्रकारची जबाबदारी बँकेवर राहणार नाही.

१६) जीएसटी व इतर कर वेगळा भरावा लागेल.

१७) बीड रुपये १०,०००/- चे पटीत बोलेले पाहिजेत.

१८) खरेदीदाराने नावावर गाडी ट्रान्सफर झालेवर आर.सी.टी.सी.ची झेरॉक्स प्रत बँकेस सादर करावी लागेल. तसेच सदर वाहनावरील वाढीव कर गाडी घेणारास भरावा लागेल व त्याची झेरॉक्स प्रत बँकेस सादर करावी लागेल. आर.सी.टी.सी.झेरॉक्स प्रत दाखल करेपर्यत खरेदीदाराने १०% बयाना भरलेली रक्कम परत केली जाणार नाही.

१९) या बाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार निर्माण झाल्यास मा.अवसायक साहेब अगर त्यांचे प्रतिनिधी देतील तो निर्णय अंतिम समजणेत येईल व तो वाहन खरेदी घेणाऱ्यावर बंधनकारक राहील.

**दिनांकः- १३/१०/२०२६**
**ठिकाण :- अहिल्यानगर**

Nagar Urban Co-op. Bank Ltd. Ahmednagar Regd. No. MSCS/CR/ 804/2013 Multi-State Scheduled

**अवसायक**
**नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अ.नगर**
**तथा डायरेक्टर, एन.सी.डी.सी.**
**सहकार मंत्रालय, भारत सरकार**

Scanned with OKEN Scanner